पुढारी

# प्रशासकीय कार्यालयातील कामकाज आजपासून सुरू



शिवाजी विद्यापीठातून...

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील प्रशासकीय कार्यालये व अधिविभागात आवश्यकतेनुसार सोमवार (दि. ८) पासून कामकाज सुरू होणार आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये, यासाठी शासन नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकार, जिल्हाधिकाऱ्यांकडून सुधारित मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करण्यात आली आहेत. नुकतेच कुलसचिवांनी विद्यापीठ अधिविभाग प्रमुख, प्राचार्यांना परिपत्रक काढले आहे. त्यानुसार अत्यावश्यक सेवा प्रदान करणारे विभाग वगळता अन्य

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर नियमांचे काटेकोर पालन

विभागातील शिक्षकेतर, अधिकारी व सेवकांपैकी १५ टक्के याप्रमाणे अधिकारी व सेवकांना रोटेशननुसार कार्यालयात बोलावून कार्यालयीन कामकाज करून घेतले जाणार आहे.

सुरक्षा विभाग, आरोग्य विभाग व अभियांत्रिकी अंतर्गत असलेली कार्यालये पूर्ण क्षमतेने सुरू असणार आहेत. अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मास्क घालणे गरजेचे आहे. सॅनिटायझर उपलब्ध करून देण्यात आले आहे. कार्यालयीन कामकाज करताना आवश्यक ती खबरदारी घेतली जाणार आहे. अत्यावश्यक कामासाठी ई-मेलद्वारे संपर्क साधावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले आहे.

पुढारी

# विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ वृत्तपत्रविद्या व मास कम्युनिकेशन विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ९ व १० जून रोजी राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे.

'कोव्हिड इंफोडेमिक अँड मीडिया' हा वेबिनारचा विषय आहे. यात कोरोना महामारीच्या काळात माध्यमांची भूमिका याविषयी तज्ज्ञ विचार मांडणार आहेत. वेबिनारमध्ये वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे डॉ. राजन पाटील, युनिसेफ, महाराष्ट्रच्या प्रमुख राजेश्वरी चंद्रशेखर, डॉ. स्वाती मोहपात्रा, प्रा. जे एफ पाटील, प्रा. जय सामंत, प्रा. राजेंद्र पारिजात, डॉ. राधेश्याम जाधव, प्रा. विजय ककडे, प्रा. मार्टिन मॅथ्यू, युनिसेफ महाराष्ट्रचे डॉ. खाणिंद्र भुयान, डॉ. राजलक्ष्मी नायर संवाद साधणार आहेत.

विद्यार्थी, संशोधकांनी वेबिनारसाठी नोंदणी करण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

Kolhapur Edition
8 Jun, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# पर्यावरण संवर्धनाचा प्रश्नमंजूषेतून जागर

## शिवाजी विद्यापीठ, सहयोगींचा अभिनव उपक्रम

**कोल्हापूर, ता. ७ :** शिवाजी विद्यापीठ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि फ्रायडेज फॅर फ्युचर यांनी पर्यावरण संवर्धनासाठी अभिनव उपक्रम सुरू केला आहे. यामध्ये एक लिंक बनवून त्यावर एक व्हिडिओ अपलोड करण्यात आला आहे. हा व्हिडिओ पर्यावरणावर आधारीत आहे. तो पाहून लिंकवर असलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यायची. त्यानंतर सहभागी व्यक्तीला प्रमाणपत्र दिले जाते.

लॉकडाउनच्या काळामध्ये सर्व व्यवहार बंद होते. यामुळे हवा, पाणी, ध्वनी प्रदुषणात घट झाली. नद्या काही प्रमाणात स्वच्छ झाल्या. मात्र लॉकडाउन शिथिल झाल्यानंतर सर्व व्यवहार पूर्ववत सुरू होतील. त्यामुळे पून्हा पर्यावर्णीय प्रश्न निर्माण होतील. अशा काळात सर्वांच्यामध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जाणिव निर्माण व्हावी यासाठी एक अभिनव उपक्रम सुरू करण्यात आला आहे. शिवाजी विद्यापीठ, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि फ्रायडेज फॅर फ्युचर यांनी संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवला आहे. यामध्ये एक लिंक बनवण्यात आली असून यामध्ये पर्यावर्णाविषयक व्हिडिओ बनवण्यात आला आहे. हा व्हिडिओ पाहून त्यावर आधारीत असणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दिल्यास आपण या उपक्रमात सहभागी होऊ शकता. यामध्ये सहभागी होण्यासाठी कोणतीही अट नसून कोणीही यामध्ये सहभागी होऊ शकते.

# आजपासून विद्यापीठात १५ टक्के कर्मचारी

## नवीन शैक्षणिक वर्षातील कामकाजाला गती येणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लॉकडाऊनच्या नियमांचे पालन करीत शिवाजी विद्यापीठातील अस्थापना, परीक्षा विभागासह अन्य विभागाचे कामकाज सुरू होते. इतर विभागांमध्येही आवश्यकतेनुसार कर्मचारी आपआपले कामकाज करीत आहेत. तब्बल तीन महिन्यानंतर विद्यापीठातील सर्वच विभागासह महाविद्यालयात रोटेशननुसार १५ टक्के कर्मचाऱ्यांना आजपासून (दि. ८) कामावर हजर राहण्याच्या सूचना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी परिपत्रकाव्दारे दिल्या आहेत. शासन आदेशानुसार रोटेशननुसार १५ टक्के कर्मचारी कामावर रूजू राहणार आहेत.

कोरोना कालावधीतही शिवाजी विद्यापीठासह महाविद्यालयातील कामकाज सुरूच होते. विद्या परिषद,



व्यवस्थापन परिषदेसह अन्य बैठका वेबिनारव्दारे घेण्यात आल्या आहेत. तसेच विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांसह इतर मार्गदर्शनही करण्यात आले आहे. तसेच कोविड-१९ जनजागृती ऑनलाईन प्रश्नमंजुषेला आजी-माजी विद्यार्थ्यांसह अबाल वृध्दांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे सर्वत्र कौतुक झाले. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनीही कोरोना योध्दा म्हणून आपली जबाबदारी पार पाडली.

महाविद्यालयांसह विद्यापीठातील सर्व अधिविभाग, प्रशासकीय विभागांमध्ये आजपासून रोटेशननुसार १५ टक्के कर्मचारी कामावर रूजू होणार आहेत. त्यामुळे नवीन शैक्षणिक वर्षातील कामकाजाला वेग येणार आहे. कुलसचिवांनी पाठवलेल्या परिपत्रकानुसार प्राचार्यांनी १५ टक्के कर्मचाऱ्यांना महाविद्यालयात हजर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### शासन आदेशानुसार १५ टक्के कर्मचारी कामावर

लॉकडाऊनमध्येही प्रशासन कार्यरत असल्याने कामकाज सुरूच होते. आता शासनाच्या आदेशाप्रमाणे विद्यापीठातील सर्व विभागांमध्ये १५ टक्के कर्मचाऱ्यांना रोटेशननुसार हजर राहण्याच्या सूचना केल्या आहेत. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू करण्याच्या दृष्टीने कामकाज सुरू करण्यात येणार आहे.

**- कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर (शिवाजी विद्यापीठ)**

तरुण भारत Mon, 08 June 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52592551

# विद्यापीठात ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात 'एम.एससी'साठी नाव नोंदवण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया राबवली जाणार आहे. याची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर आहे. ही केवळ नोंदणी असून प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया गुणपत्रक हाती आल्यानंतरच केली जाईल, अशी माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली. कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने सर्व शाखांच्या अंतिम परीक्षा घेऊ नयेत. अशी भूमिका राज्य शासनाने घेतली असून याबाबतचा अंतिम निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र विद्यापीठाने एम.एम.सीसाठी नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन सुरू केली आहे.

## » दृष्टिक्षेपात

# 'कोरोना आणि माध्यमे' विषयावर वृत्तपत्र विद्या विभागातर्फे वेबिनार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र विभाग, मास कम्युनिकेशन विभाग आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन केले आहे. 'कोव्हिड इंफोडेमिक अॅन्ड मीडिया' या विषयावर वेबिनार असून, मंगळवारी (ता. ९) आणि बुधवारी (ता. १०) असणार आहे. यामध्ये पर्यावरण, माध्यमे, अर्थशास्त्र या विषयातील जाणकार सहभागी होणार आहेत, अशी माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा मुढे यांनी दिली आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे डॉ. राजन पाटील, युनिसेफ महाराष्ट्रच्या राजेश्वरी पाटील, डॉ. स्वाती महापात्रा, राजेश्वरी चंद्रशेखर, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, प्रा. जय सामंत, डॉ. राजेंद्र पारिजात, डॉ. राधेश्याम जाधव, प्रा. विजय ककडे, प्रा. मार्टिन मॅथ्यू, डॉ. राजलक्ष्मी नायर, डॉ. राजेंद्र पारिजात सहभागी होणार आहेत. यामध्ये सादर होणाऱ्या निबंधांचे पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे. सहभागी होण्यासाठीच्या लिंकसाठी वृत्तपत्र विभागाशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# विद्यापीठात उद्यापासून राष्ट्रीय वेबिनार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या आणि मास कम्युनिकेशन विभाग आणि युनिसेफ (महाराष्ट्र) यांच्या वतीने उद्या, मंगळवारी आणि बुधवारी (दि. १०) राष्ट्रीय वेबिनार होणार आहे. त्याचा विषय 'कोविड इंफोडेमिक अँड मीडिया' हा आहे. वेबिनारमध्ये कोरोनाच्या काळात माध्यमांची भूमिका काय असावी; माहितीच्या अभूतपूर्व महापुरात अचूक माहिती प्रसारणात माध्यमाची भूमिका याविषयी तज्ज्ञ चर्चा करणार आहेत त्यात वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे डॉ राजन पाटील, युनिसेफ महाराष्ट्रच्या प्रमुख राजेश्वरी चंद्रशेखर, स्वाती मोहपात्रा, प्रा. जे. एफ. पाटील, जय सामंत, राजेंद्र पारिजात, राधेश्याम जाधव, विजय कक्कडे, मार्टिन मॅथ्यू, खाणींद्र भुयान, राजलक्ष्मी नायर, आदी संवाद साधणार आहेत.

लोकमत

## महत्त्वाचे

# विद्यापीठात कर्मचाऱ्यांची उपस्थिती वाढणार

कोल्हापूर : शासकीय कर्मचाऱ्यांनी आठवड्यातील किमान एक दिवस कार्यालयात हजर राहणे अनिवार्य राहील, असे परिपत्रक राज्य सरकारने शुक्रवारी काढले आहे. त्यानुसार आता शिवाजी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती सोमवारपासून (दि. ८) वाढणार आहे. सध्या विद्यापीठात १० टक्के कर्मचारी कामावर येतात.